# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र.८४–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. महादेव दत्तू लोहार,<br>मु.पो राजापूर, ता. तासगांव, जि. सांगली | अर्जदार |

**विरूध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>ग्रामीण विभागीय कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय क्र. २, तासगांव, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

<u>कोरम</u> :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## <u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>

(ग्राहक तक्रार निवारण मंच)

विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## <u>न्याय निर्णय</u>

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. महादेव दत्तू लोहार, मु.पो राजापूर, ता. तासगांव, जि. सांगली यांनी प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत मंचाकडे दि. १.४.२०१० रोजी ' अ ' फॉर्ममध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे मंच व विद्युत लोकपाल) अधिनियम २००६ चे कलम ६.१० नुसार वितरण कंपनीविध्द तक्रार दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे –

तक्रारदार यांनी त्यांचे शेतीपंपास नवीन विद्युत पुरवठा मिळावा म्हणून वि.प.कडे दि. १३.१.२०१० रोजी अर्ज केला. त्यासोबत चलन रु. ५०/– पावती क्र ८२३१५०८ नुसार दि. १३.१.२०१० ला भरले आहे. कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार मुदतीत चलन न दिल्याने तक्रार दाखल केली आहे. सुरुवातीस तक्रारदार याने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे दि. १७.३.२०१० ला ' क्ष ' फॉर्ममध्ये तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाने दि. २९.३.२०१० च्या आदेशानुसार कृती मानके साध्य करण्यात अपयश आल्यास ग्राहकास द्यावयाच्या भरपाईबाबत निर्देशित केले आहे. म्हणून प्रस्तुतचा तक्रार अर्ज केलेल्या तारखेपासून प्रत्यक्ष चलन मिळेपर्यंतच्या तारखेपर्यंत विलंबापोटी भरपाई द्यावी अशी मागणी तक्रारदाराने केले आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. २८.४.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदार यांस दि. ३१.३.२०१० रोजी चलन देण्यात आले असे म्हटले आहे. सदर तक्रारीची सुनावणी मंचासमोर दि. १७.५.२०१० रोजी ठेवली असतां, तक्रारदार गैरहजर. वि.प. तर्फे २५ दिवसांचा विलंब झाल्याचे मान्य केले आहे. परंतु तक्रारदाराने चाचणी अहवाल दि. १६.४.२०१० ला दिला. १ पोलचे काम आहे, दि. २०.५.२०१० पर्यंत कनेक्शन देण्यात येत आहे असे वि.प.च्या अधिकाऱ्यांनी सांगितले. तक्रारदार याने दि. १८.५.२०१० ला मंचास अग्रेषित केलेल्या पत्रानुसार वीज जोडणी दि. १८.५.२०१० ला मिळाल्याचे म्हटले आहे व नुकसान भरपाईबाबतची तक्रारीतील मागणी मागे घेत आहे किंवा रद्द करावी.

या बाबतीत तक्रारदाराने मंचाला अग्रेषित केलेल्या पत्रात श्री. हरीभाऊ खापरे यांना दिलेली संमत्ती मागे घेत आहे असे म्हटले आहे. तक्रारदारास असे असे करण्यास निश्चितपणे मुभा आहे परंतु हा तक्रारदार व प्रतिनिधी यांच्यातील अंतर्गत विषय आहे. परंतु असे दिसते की, वि.प.च्या फिल्ड ऑफीसरच्या कल्पनेतून तक्रार प्रतिनिधीच्या अधिकारात मागे घेत आहे असे दाखविण्याचा प्रयत्न दिसतो. स्वतंत्रपणे पत्र–व्यवहार करुन किंवा सुनावणीवेळी प्रतिनिधीचे अर्जावरुन कार्यवाही करावी. असे असले तरी, वि.प.ने सुनावणीचेवेळी कबूल केल्याप्रमाणे तक्रारदार यांस दि. २०.५.२०१० पूर्वी म्हणजे दि. १८.५.२०१० रोजीच कनेक्शन दिले आहे असे दिसते. तसेच तक्रारदार यांनी त्यांचे तक्रारीसंदर्भात दि. २०.४.२०१० चे सायक्लोस्टाईल पत्र दिले आहे व त्यात वीज कनेक्शन मंजूर झाले आहे, डिपॉझीट भरुन टेस्ट रिपोर्ट दिला आहे असे म्हटले आहे. परंतु असा सायक्लोस्टाईल अर्ज अथवा पत्र–व्यवहार तक्रारदाराने केल्याचे प्रतिनिधींना जाणीव अथवा माहिती देणे जरुरी आहे. असे असले तरी, ७ आठवड्यांच्या विलंबापोटी रु. १००/– प्रति आठवडा याप्रमाणे रु. ७००/– भरपाई तक्रारदारास मिळण्याचा हक्क प्राप्त झाला आहे, तो त्याने सोडून दिला आहे. मूळ तक्रारीत मंचाकडे केलेली भरपाईची मागणी तक्रारदाराने मागे घेतली असल्याने तक्रार निकाली काढणे योग्य होईल. तक्रारदाराची वीज कनेक्शन मिळणे बाबतची मागणी संदर्भात वि.प.ने कनेक्शन देण्याची तयारी दाखविली व कबूल केल्याप्रमाणे मुदतीत कनेक्शन दिले याची नोंद घेवून तक्रार निकाली काढणेत येत आहे.

ग्राहक तक्रार निवारण मंचाचे अध्यक्षांचे पद दिनांक ३.९.२००९ ते २०.१०.२००९ व सदस्य यांचे पद दि. १.९.२००९ पासून दि. २.११.२००९ पर्यंत रिक्त राहिल्याने मंच कार्यान्वित नसल्याने १०० पेक्षा अधिक प्रकरणांची सुनावणी व निर्णय प्रलंबित राहिल्याने ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००५, क्र. ५:१ चे तरतुदीनुसार सदर अपिलावर असलेल्या दोन महिन्यांचे मुदतीत निर्णय करणे शक्य झाले नाही.

## आदेश

१) तक्रारदाराचा दि. १८.५.२०१० च्या अर्जानुसार तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )

अध्यक्ष

श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :